## पोलीस उप—आयुक्त (प्रकटीकरण), गुन्हे शाखा, मुंबई.

दि. २५/०६/२०१९ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते पोलीस क्लब, पहीला मजला, आझाद मैदान, मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या माहे **एप्रिल** —२०१९ या महिन्याचा " **BEST CONVICTION OF THE MONTH** " चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

## बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ माहे एप्रिल — २०१९

| ०२ | गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—५ | गु.र.क्रं. ६९/१४, कलम ३६४ (अ), १२०(ब), ३४२, ३८७, ३४ भादंवि (शाहुनगर पो.ठाणे, गु.नो.क्र. १८२/१४) |
|---|---|---|

**—:खून करण्याच्या उदद्श्याने अपहरण करुन खंडणी मागणे:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत:**— फिर्यादी पंकज गुप्ता यास जुलै व ऑगस्ट २०१४ मध्ये हरियाणा येथुन राहुल याने फोन करुन ते कायदेशीर मार्गाने सोन्याची विक्री करीत असल्याचे सांगितले. त्यासाठी त्यांना सेल्समनची आवश्यकता असल्याचे सांगुन फरीदाबाद, हरियाणा येथे भेटण्यासाठी बोलाविले. फिर्यादी यांनी त्यांचा भाऊ प्रविण गुप्ता यास सदर कामासाठी फरीदाबाद, हरियाणा येथे पाठविले. तेथे गेल्यानंतर आरोपींनी त्यास डांबुन ठेवले व फिर्यादीकडे त्याच्या भावास सोडण्यासाठी ५ लाख रुपयांची खंडणी मागितली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. पंकज रामकुमार गुप्ता, वय २४ वर्षे, |
| **बळीत/मयत** | :— | प्रविण रामकुमार गुप्ता, वय १९ वर्षे. |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) इरफान हमीद खान उर्फ कुरेशी, वय ४६ वर्षे,<br>२) इलियास फैझर खान, वय ४४ वर्षे,<br>३) वाहिद तोला जोगी, वय ३० वर्षे,<br>४) कासम तोला मेऊ उर्फ खान वय २९ वर्षे,<br>५) आझाद नन्हे मेऊ उर्फ खान, वय २९ वर्षे<br>०९/०८/२०१४ |
| **निकाल दिनांक** | :— | **१२/०४/२०१९** |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :— | सर्व ५ आरोपींना<br>१) कलम ३६४ (अ) सह १२० —ब भादंवि अंतर्गत **जन्मठेप** व रु.२०००/— द्रव्य दंड,<br>२) कलम ३८७ सह १२०—ब भादंवि अंतर्गत **५ वर्षे** व रु. २०००/— द्रव्य दंड,<br>३) कलम ३४२ सह १२०—ब भादंवि अंतर्गत **१ वर्ष** व रु. १०००/— द्रव्य दंड<br>४) कलम १२०—ब भादंवि अंतर्गत **जन्मठेप** व रु. २०००/— अशी शिक्षा ठोठावली आहे. |

**<u>तपास कौशल्य</u>** :— सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर फिर्यादी यांना खंडणीकरीता आरोपीचे फोन येत होते. दि. ०९/०८/२०१४ रोजी आरोपींनी खंडणीचे पैसे देण्याकरीता फिर्यादी यांना कामा, राजस्थान येथे बोलावले त्यावेळी गुन्हे शाखा, कक्ष—५, येथील तपास पथकाने १) इरफान हमीद खान उर्फ कुरेशी, वय ४६ वर्षे, २) इलियास फैझर खान, वय ४४ वर्षे, ३) वाहिद तोला जोगी, वय ३० वर्षे, ४) कासम तोला मेऊ उर्फ खान वय २९ वर्षे, ५) आझाद नन्हे मेऊ उर्फ खान, वय २९ वर्षे सर्व रा.ठि.— मु.पो. नेदा, ता— पुरहाना, जि. मेऊ, मेवात, हरियाणा. या आरोपींना रंगेहाथ अटक करुन अपहरण केलेल्या प्रविण गुप्ता याची सुखरुप सुटका केली. सदर गुन्हयाचा सखोल तपास करुन आरोपीविरुध्द सबळ पुरावा प्राप्त करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. अटकेपासुन निकालापर्यंत सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये होते.

सदर खटल्याची सुनावणी मा. सत्र न्यायालय, कोर्ट क्र. १९, मुंबई येथे चालविण्यात आली. सुनावणीमध्ये १४ साक्षीदार तपासण्यात आले. तपासी अधिकाऱ्यांनी आरोपींविरुध्द सर्व साक्षीपुरावे, तांत्रिक पुरावे, परिस्थितीजन्य व कागदोपत्री पुरावे मा. न्यायालयात सादर केले. मा. सत्र न्यायालयाने सदरचे पुरावे ग्राहय मानून दि. १२/०४/२०१९ रोजी निकाल दिला. त्यामध्ये सर्व ५ अटक आरोपींना दोषी ठरवुन शिक्षा सुनावण्यात आली.

सदरचा संवेदनशील गुन्हा उघड करुन दोषसिध्द झाल्याने सदर गुन्हयातील अटक आरोपी नामे १) इरफान हमीद खान उर्फ कुरेशी, वय ४६ वर्षे, २) इलियास फैझर खान, वय ४४ वर्षे, ३) वाहिद तोला जोगी, वय ३० वर्षे, ४) कासम तोला मेऊ उर्फ खान वय २९ वर्षे, ५) आझाद नन्हे मेऊ उर्फ खान, वय २९ वर्षे यासर्व आरोपीताना सत्र न्यायालयाने खालील प्रमाणे शिक्षा दिलेली आहे.

सर्व ५ आरोपींना १) कलम ३६४ (अ) सह १२० —ब भादंवि अंतर्गत जन्मठेप व रु.२०००/— द्रव्य दंड, २) कलम ३८७ सह १२०—ब भादंवि अंतर्गत ५ वर्षे व रु. २०००/— द्रव्य दंड, ३) कलम ३४२ सह १२०—ब भादंवि अंतर्गत १ वर्ष व रु. ४) कलम १२०—ब भादंवि अंतर्गत **जन्मठेप** व रु. २०००/— अशी शिक्षा दिली आहे.

मा. पोलीस आयुक्तांनी माहे **<u>एप्रिल—२०१९ चे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कुष्ठ गुन्हे दोषसिध्दी</u>** या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—५,मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| १ | स.पो.आ. | नेताजी भोपळे |
| २ | प्र.पो.नि. | अशोक खोत |
| ३ | स.पो.नि. | संपतराव राऊत |
| ४ | पो.उ.नि. | दत्तात्रय सानप |
| ५ | पो.उ.नि. | महेश बंडगर |
| ६ | पो.ना.क्र. ९०५५१६ | प्रशांत वेंगुर्लेकर |